# चांदोबा.....!

रांगता रांगता
शिकले होते,
ढवळ्या रंगाच्या चंद्राला,
चांदोमामा म्हणायचं शिकले होते........!

दुरवर असायचाय खुप
पण मंद प्रकाशातच उजळुन टाकायचास रे तू
दोन घास भरवता भरवता मला,
चांदोमामा चांदोमामा ,म्हणत तुला
आईला भारावून टाकायचास रे तू.....!

प्रेमाची ओढ लागली,
यौवनात येता मला,
शांत वाऱ्यात,
चांदण्यांच्या सहवासात,
काल्पनिकतेतून का होईना,
माझ्यासाठी,
फक्त तू एकटाच दिसायचास रे मला......!

दिवसा ढवळ्या,वाटतं,
आराम करता करता,
काही क्षण का होईना,
‘यावंस तू खाली’
नाही बोल्लास तरी जमेल रे मला,
वाटते मला तुझी सोबत हवीशी......!

माहितीए मला.....
रात्रीच्या काळोखात
साथ देणार तू
वृद्धत्वाच्या काळोखात मला कधी
एकटं पडू देणार नाहीस रे तू.......!

खुप भारी वाटतं,
तुझं ते भारावणं मला,
रुप बदलता बदलता स्वतःचं,
खुप खुप शिकवुन जातोस रे मला....!

धन्यवाद चंद्रा,
लहानपणीच्या लाडासाठी !
धन्यवाद चंद्रा,
तारुण्यातल्या ताऱ्यांसाठी !
धन्यवाद चंद्रा,
वृद्धत्वातील प्रकाशासाठी !
मनोमन आभार चंद्रा.......,
आयुष्यभर साथा देण्यासाठी !

# काळ

काळ होता काळोखाचा
दिवस होते फुलव्याचे,
बहिर झाले सुख माझे
मुक झाले शब्द ते......

विखुरलेल्या .......साऱ्या दिशा
विस्कटलेली........वाट ही
सरस होते प्रेम माझे....
साथ होती प्रेमाची.....

आस होती शिखराची
यशाची (तर) ओढ ही
धडपडले मी, कुणासाठी?
जाण होती.......विश्वाची.....

धाडस केले,त्या किरणांनी
एकवटले,सारे संगती,
उजळलेल्या, दाही दिशा,
सावरलेली वाट हा!

जरी काळ होत काळोखाचा,
प्रकाश आता दाही दिशा.....

गहिवरले मन माझे
काळोखाला निरोप देता
फुलली माझी सारी फुले,
स्वागत होता हर्षाचे !

# निरोप

विचार तुझा मनात येताच,
कंठ माझा दाटुन गेला.
क्षणभर असलेल्या भेटींची तू
आठवण तेवढी सोडून चाल्लास

घडले होते प्रसंग सारे,
परीक्षा आपली घेणार.
उबे ठाकलो,बळ घेऊनी,
एकमेकांप्रती आपुलकीचे

आता मात्रद्व
अस्तित्व नसेल सोबतीचं
मन तेवढं दडून राहील
नसली जरी शक्ति माझ्यात
मनाचं पाठबळ नेहमीच तुझ्यासोबत राहील

मोलाच्या त्या भेटी आपल्या
समर्थ शक्तिचा भाव छोटासा
सर्वदुर पसरवून ये तू,
सुवास आपल्या मैत्रीचा

जुन्यांना (जुन्या आठवणी) जपून, नाविण्य बघ.
सगळ्या स्मृती मनात जप.
पंख आहेतच बळ असलेले,
आता फक्त उड्डाण कर…!

# विजयी लढा

संपली आता अग्निपरीक्षा,
राहिला कल्लोळ फक्त
सर्वदूर पसरलेल्या रंगहीन राखेचा...

काही क्षणांसाठी असलेल्या अग्निज्वाला,
स्पर्श करीताच शरीराला,
ठेवून जाणार आठवण आता...
आयुष्यभरासाठी...

अनुभवांचे बोल काही,
समजावतील नेहमीसाठीचा जीवनमार्ग
श्वासोच्छवास तर सारखच असेल आता
उरतील फक्त आठवणी, त्या काट्यांच्या....

काटे कसले....?
शीतयुद्ध म्हणाना...!
क्षणभरही न जाणवू देणारा,
सहवास त्यांचा

गेले असते सैनिक माझे,
जर केला असता वार त्यांनी
सोसुनी वार त्यांचा
झाले रक्तबंबाळ सारे

राहतील या साऱ्या खाणाखूणा लढ्याच्या
अन् महत्वाकांक्षी "वितयाच्या"

नाजुक मनाला रुतलेले काटे,
देऊन गेले स्फुर्ती सारे,
म्हंटलं  ‘साजुक’ मन माझ,
होऊ दे आता वार कितीही,
कधीच मागे नाही हटायचे,
भरतील रे जखमा साऱ्या.....
नव्या उमेदीला सोबत घेऊन....

याच उमेदीने जगणार,
सुख देणाऱ्या विचारांत राहणार,
अविरत मिळणाऱ्या मनःशांती सोबत,
मी मनसोक्त जगणार....

नेहमीच फडकेल मग आता.....
विजयी झेंडा माझा.....

# आई

झळाळत्या उन्हातही थंडगार वाऱ्याची झुळूक माझी
कडाक्याच्या थंडीतही मनभरुन उब देणारी,
तूच तर असतेस ना गं...आई..!

चुका केल्यास,आधी रागावणारी,
प्रत्येक गोष्टीचं गांभीर्य बिंबविणारी,
अधोरेखित चुकांना माझ्यातुन मिटविणारी,
तूच तर असतेस ना गं...आई..!

प्रयत्नांनी साध्य केलेल्या गोष्टींचं कौतुक करणारी,
मी कष्टीने मिळविलेल्या छोट्याशा यशाने आनंदित होणारी,
ओठांतील शब्द हळूच लपवत,आनंदी डोळे पुसणारी,
तूच तर असतेस ना गं...आई..!

थोडं कधी खुपलं मला तर बरं होईपर्यंत काळजी घेणारी,
जखमा झाल्या तरी,''त्या शिकवणी आहेत'' असं सांगणारी,
घरुन निघताना,''हळुच जारे राजा....'' असं प्रेमाणे सांगणारी,
तूच तर असतेस ना गं...आई..!

खुप चिंतातूर झाल्यावर माझं खोट हसू ओळखणारी,
हळुच कुशीत घेऊन, ''हमम ..सांग बरं आता'' असं हळुच म्हणणारी
माझं मन शांत करुन मगच मला निजविणारी....,
तूच तर असतेस ना गं...आई..!

प्रत्येक दिवशी आयुष्याच्या माझ्या दिवाळी मनविणारी
''सुर्य नाही तर दिवा बनून सेवा करावी'' असं सांगणारी
मला प्रज्वलीत करणारी,
तूच तर असतेस ना गं...आई..!

# आयुष्य

एक रंजक कथा !
टप्प्याटप्प्यांत मिळालेली शिकवण
सरळ वाटेवरचा मृगजळ कधी तर कधी,
स्वतःकडेच खेचणाऱ्या
या साऱ्या दिशा.

प्रत्येक क्षणी प्रेरणादायी
या अनमोल क्षणांना,ह्रदयात जपणारी
कोणतीच तुलना न करणारी,
रंगांची उधळण सारी
हीच आयुष्याची रंजक कथा....!

हर्षदायी भविष्यासाठी प्रेरित करणारी
जगण्याच्या चालिरितींचे मौल्य जपणारी
सप्तरंगांतून प्रत्येकाचा आदर जपणारी
कोणतीही तुलना न करता दर्जेची
हीच आयुष्याची
एक रंजक कथा.....!

लपंडाव खेळता खेळता
ठेवा अनमोल गाठींचा
प्रेमाने आपल्या,साऱ्यांनाच
दवडून ठेवणारी,
मिठीतच आपल्या आयुष्याची,
ही,एक रंजक कथा !

# <u>माझा - लाजाळू !</u>

स्पर्श करिताच,
लाजलास तू
खरं खरं सांग,
र्स्पशाने माझ्या,
घाबरलास तर नाही ना तू......?

लहानाचा मोठा झालास, स्वतःच स्वतःला,
विस्तारायचं शिकलास
कोमलतेनं हा फिरविताना तुझ्यावर,
खरं खरं सांग,
चिडला बिडला तर नाहीस ना तू....?

तुला लाजताना पाहून,
स्त्रीचं लाजणं आठवतं मला
कोणत्याही शिकवणी न लावता,
खरं खरं सांग,
कस काय लाजायचं शिकलास रे तू......?

आजुबाजुला कोणीच नसल्यावर
स्वच्छंदतेचा मोकळा श्वास खेचत
परत हळुहळु जागा व्यापतोस स्वतःची
खरं खरं सांग,
ही चतुरता कोणाकडून शिकलास रे तू....?

माहितीय मला,न शिकताच,न घाबरता,
चतुरी दाखवत शांत राहणाऱ्या वेड्या,
लाजाळू म्हणतात बरं सारे तुला!
मग खरं खरं सांग
हे सगळं मला कधी शिकविणारेस रे तू.....?

# किनारा

आसमान से गिरते गिरते
आज समंदर मे खो गए,
पाणी की चाहत मे आज
निचेतक डूब गए.....!

सिखनेही लगे थे उडना जब हम,
ठेच लगी तो गिर पडे
लगता था के,गिरेंगें जमीन पर,
फिर इस समंदर ने खिचा हमको
आज तो हम उडना भी खो बैठे !

आज तैरते तैरते,थक तो गए है,
पर डरते डरते कही रुक नही गए है
पता है,के दूर तो है वो हमसे,
पर छुपने वाला ऐसा कोई,
‘‘किनारा’’ नही है......!

# नातं-तुझं नि माझं !

नातं तुझं नि माझं,
दिवसागणिक बदलणारं
कधी भांडण तंटा,
तर कधी प्रेमाचं गाणे !

प्रेमाची चव,
थोडी चाखली क्षणभर
तरीही मन भरणारं,
तुझं-माझं आयुष्यभर !

भांडणाची किरकिर,
थोडीशीच कधीतरी
मग का या भांडणाला,
उरापाशी जपायचं....?

सांग मग तुच आता,
किती दिवस असं दुर राहायचं,
खुप जवळ असुनही......!

सांग मग तुच आता,
भुतकाळाला विसरुन,आपण
वर्तमानात का नाही जगायचं....?

म्हण ना तु एकदा तरी की,
प्रेम खुप जपायचं
मग, वेळ (काळ) येऊ दे कोणतीही !

# लग्न

प्रेम हवं,
तडजोड नका,
रुसव्या फुगव्यातही
व्देश नको !

लोकांच्या गराडयात
मनधरणी नका,
खऱ्या  प्रेमात
बलाढ्य आशा नको

माणुसकीच्या जगण्यात,
जातीयुक्त बांध नको.
प्रितीच्या झऱ्यात,
विषयुक्त धारा नको !

हव्यासेपोटी,
राग राग नको,
आदरयुक्त प्रेमाचा,
वर्षाव फक्त असो !

तुटलं फुटलं कधी, तरीही,
पक्की अशी जोड असो
ओढणारे ओढतातच हो, दोहो बाजुंनी
हाडे तेवढी खिळखिळी नको !

अटींच्या बंधनांवर
सामर्थ्याचा दबदबा नका
बांधिलकी परस्परांशी घट्ट ठेवत,
नात्याची तेवढी,श्रीमंती असो

# सांग देवा, कसा भेटू ?

सांग देवा, कसा भेटू ? तुला मी..
सांग देवा यां रांगेमधी दिसतोय का रे ? तुला मी..
तुला भेटण्याच्या येळा इसरलो रे जरा मी

मुकुट तुझा दिसत व्हता,
तव्हाच घंटा वाजविली
थांबा म्हणे ताटकळतच
झोप होऊद्या देवाची

तुझ्यासाठी आणलेली,
फुले जरा कोमेजली
पैशाचा दिवा दाखवत
मंडळी तुला,मागुनच्च बिलगली !

घंटा न वाजवताच,
झोपेतच तुला माळ घालुन गेली,
तिही पैशाची

खोंट खोंटच डोकं टेकवलं असणार त्यानी
नजरेत तुझ्या येऊ न्हाई म्हणून
खोट्या खोट्या पुजेनंच पावतोस का रे देवा तू ?
सांग ना रे देवा मला,
कशाला या (------) उजेड दाखवतोस तू ?

(सुटला होता वारा
खुप सोसाट्याचा
या साऱ्या गसाड्यात आज)

व्दार उघडलं,
बऱ्याच येळानं
म्हण्टले,
आता देव झाला जागी
पटापटा डोकं टेकवून
काढले रे बाहेर
सारेच भाविक,धक्काबुक्की करीत

मानेसंग माझ्या,
मनाला बी हिसका बसला
म्हण्टलं,
जो दिसलाच न्हाई रांगा लाऊन बी,
काऊन उबा राहू मंग मनातल्या देवाला
माझ्या अतृप्त ठेवुनी ?

# प्रेम हवंय - पैसा नाही (व्यसनाधिनता)

जन्म दिला
लळा लावला
हळूहळू जगण्याच्या
रिती आम्हाला शिकविल्या !

अक्षरी ज्ञान देण्यासाठी
शाळे टाकलं
चुका आम्हीपण केल्या,
तेव्हा आम्हाला,
एका फटक्यात निट केलं !

मोठे झालो,
सगज दिली
स्वतःचं स्थान निर्माण करण्याची
सगज दिली
शिस्तीत राहणं,
शाळेत शिकला
पण, मनमोकळा संवाद आमचा
तुमच्या सोबतच जुळला

तुमचं आयुष्य जगता जगता
जगायला आम्हाला शिकवलंत तुम्ही
वाट खुप अडचणीतली होती
चुकांचं निरसन करीत
ताठ-मानेनं जगायचं शिकवलंत तुम्ही !
मग का, आज प्रेम संपलंय आपलं,
जशी घरात निर्जीव सापळे असावित

प्रेमाला तुमच्या गंज चढलाय,
मोल नसलेल्या त्या मुल्ये विसरतांत,
व्यसनाच्या त्या अधिनतेपायी !

का आपली नाते तुटावी,
त्या एका हव्यासेपोटी
खरंच समजंत असेल तर
ऐका ना बाबा,
आम्हाला तुम्ही हवेत,
पैसा नाही.
पैसा नाही.